विशेष दिवाणी दावा क्र.२३०/२०१७

नि.क्र. ८४

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. शहा यांचेतर्फे पुढील उलटतपास शपथेवर सुरु –**

१४१. शार्प मेटल ही प्रोप्रायटरी फर्म आहे. शार्प मेटलच्या प्रोप्रायटरचे नाव रमेश शहा आहे, ते म्हणजे मी. शार्प मेटलची प्रोप्रायटरशीप ही सन १९८४ साली सुरु केली. मला हे माहित नाही की, पंजाब नॅशनल बॅकेमध्ये माझे वडील प्रेमजी शहा व आई जवेरी बाई शहा यांच्या नावे जॉइन्ट सेव्हींग खाते होते. आता साक्षीदाराला प्रतिवादीतर्फे उलटतपासादरम्यान ओरीजनल बॅक पासबुक दाखवण्यात आला. [**या सदंर्भात वादीच्या वकीलांनी हरकत घेतली आहे की, सदरचा दस्त हा आधीच दाखल करायला हवा होता, तो उलटतपासादरम्यान असा अचानक साक्षीदाराला दाखवता येणार नाही. तसेच कोर्टाची परवानगी घेतली नाही. यासदंर्भात प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करण्यात आलेला आहे की, हा कागद साक्षीदाराला उलटतपासादरम्यान दाखवता येईल, ते आधी दाखल करण्याची आवश्यकता नाही. तसेच दस्त ओरीजनल असल्यामुळे कोर्टाची परवानगीची आवश्यकता नाही. तो दस्त प्रतिवादी रेकॉर्डला हजर करणारच आहे, कारण तो उलटतपासामध्ये दाखवण्यात आला आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी अतिरिक्त युक्तीवाद केला आहे की, सदरच्या प्रकरणामध्ये वादींचे म्हणणे आहे की ते एकत्र कुटुबात राहत होते त्यामुळे त्यांना सगळया व्यवहाराबाबत माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा दस्त साक्षीदाराला उलटतपासात दाखवण्यात येत आहे. कायदयाच्या तरतूदींनुसार विरोधी पक्षाला साक्षीदारला उलटतपासादरम्यान साक्षीदाराला दस्त दाखवता येवू शकतात, त्यामुळे वादीतर्फे घेण्यात आलेले हरकत नामंजूर करण्यात येत आहे.**]

१४२. हे म्हणणे बरोबर आहे की, मला आता दाखवण्यात आलेले पासबुक हे,

प्रतिवादी नं.१ यांच्या वैयक्तीक नावे रत्नाकर बॅक लि. मध्ये असलेल्या खात्याचे पासबुक आहे. **त्या दस्ताला ओळखण्यापुरते नि.क्र.२४९ देण्यात येत आहे.** मला हे माहित नाही की, या खात्याचा व्यवहार माझे वडील स्वतः बघत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या खात्यातील नोंदीबाबत व व्यवहाराबाबत मला वैयक्तीक काही माहिती नाही. मला आता दाखवण्यात आलेल्या पासबुकावरून असे दिसते की, सदरचा दस्त पंजाब नॅशनल बॅकेमध्ये प्रतिवादी नं.१ व माझी आई जवेरी शहा यांच्या नावे असलेले अस्सल पासबुक आहे. **सदर पासबुकला नि.क्र.२५० देण्यात येत आहे**. आता मला दाखवण्यात आलेले दस्तावरून दिसत आहे की, हा दस्त माझे वडील व प्रतिवादी नं.२ माझी बहिण यांच्या नावे असलेले जॉईन्ट सेव्हींग खात्याचे पासबुक आहे. **ओळखण्यापुरते त्याला नि.क्र.२५१ देण्यात येत आहे**. हे म्हणणे खरे आहे की, नि.२५० व २५१ च्या दस्तामध्ये जे खाते नमूद आहेत. ते खाते मी ऑपरेट करत नव्हतो व त्याबाबत मला माहिती नाही.

१४३. मी नरेश फडणीस युनायटेड कलर्स या नावाने व्यवसाय करणा–या व्यक्तीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, वसंतदादा औदयोगीक वसाहत येथील प्लॉट नं.१४८ मी संस्थेची परवानगी घेवून नरेश फडणीस यांना तबदील केला आहे. माझ्या म्हणणयानुसार प्लॉट नं.१४८ मी सोसायटीच्या नावे तबदील केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो प्लॉट तबदील केल्यानंतर त्याच्या मोबदल्याची रक्कम माझ्या खात्यामध्ये आली. हे म्हणणे खरे आहे की, नि.२४६ च्या दस्तामध्ये र.रु. २४ लाख मोबदला दाखवला आहे, तो मोबदला मला आता नि.२४९ व २५० दाखवण्यात आले होते त्या खात्यातून देण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ही रक्कम कोठून आली होती व कशी देण्यात आली होती याबाबत मला काही वैयक्तीक माहिती नव्हती.

१४४. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या दाव्यात व सरतपासामध्ये माझे व

माझ्या वडीलांचे एकत्र कुटुंब होते या संदर्भात केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, प्रिया मेटल इंडस्ट्रीज व शार्प मेटल इंडस्ट्रीज हा व्यवसाय आम्ही एकत्र करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, दस्त नि.२४६ अन्वये विकत घेतलेला नाशिक येथील फ्लॅट आम्ही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून विकत घेतला आहे. असे घडले नाही की, प्रतिवादी नं.३ व ४ यांना मी वैयक्तीकरित्या भेटलो व आमचे संभाषण झाले. हे म्हणणे खरे आहे की, नि.२४६ वरील अस्सल दस्त माझ्या ताब्यात नाही. मला हे माहित नाही की, देवळाई, नाशिक येथील फ्लॅट जो नि.२४६ अन्वये विकत घेतला आहे, तो हाऊसिंग लोन काढून विकत घेतला आहे. मी हे मूळ दस्त कुठे आहेत याची माहिती मागितली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, प्लॉट नं.१२६१० हा आम्ही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून विकत घेतला होता व त्यावर एकत्र बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिच्छेद ८ मध्ये जी घटना नमूद आहे, ती घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिच्छेद क्र.९ मध्ये जाहीर नोटीस संदर्भात केलेली सर्व कथने खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिच्छेद क्र.१० मध्ये माझ्या वकीलांनी पाठवलेली नोटीस व त्याला आलेले उत्तर त्या संदर्भात केलेली सर्व कथने खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिच्छेद क्र.१ ते ७, १०अ,ब, ११, ११अ ते ११प पर्यंत दावा मिळकतीसंदर्भात केलेली सर्व विधाने खोटी आहे.

१४५. हे म्हणणे खरे आहे की, ठाण्याला माझ्या मालकीचे कोणतेही घर नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ हे ठाण्यामध्ये प्रतिवादी नं.२ च्या घरातच राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी वडीलांना त्रास दिला त्यामुळे त्यांचे व माझे संबंध बिघडले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या वडीलांची सर्व काळजी आज ते ९३ वर्षाचे होईपर्यंत माझी बहिण प्रतिवादी नं.२ हिने घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये माझा हिस्सा सांगायचा म्हणून हा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही दावा मिळकतीमध्ये माझा कोणताही हिस्सा

बसत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SWARNAKALA NAVEEN SHETTY

Digitally signed by SWARNAKALA NAVEEN SHETTY
Date: 2025.07.07 17:56:48 +0530

सांगली. ( एस. एन. शेट्टी )

दिनांक–०७/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.